# प्रकरण पहिले

# शिवाजी विद्यापीठाची संक्षिप्त पार्श्वभूमी

# प्रकरण - पहिले

# शिवाजी विद्यापीठाची संक्षिप्त पार्श्वभूमी

इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात आधुनिक युगास सुरूवात होवून पाश्चात्य शिक्षण प्रसाराला गती मिळाली. भारतात एकोणीसाव्या शतकात पाश्चात्य शिक्षणामुळे प्रभावित झालेला एक समाजसुधारकांचा वर्गच तयार झाला. या सुधारकांनी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा मोडून काढून समाजाची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी शिक्षण प्रसार करण्यास सुरूवात केली. महाराष्ट्राला सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात थोर वारसा लाभलेला आहे. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील आदी समाजसुधारकांनी उच्च वर्गियांसारखेच कनिष्ठ वर्गालाही शिक्षण मिळावे म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

इंग्रजांनी इ.स. १८५४ साली नेमलेल्या चार्लस् वूडच्या खलित्यामुळे शिक्षण विषयक धोरणास मोठी चालना मिळाली. वुडस् कमिशनने शिक्षण हे प्राथमिक, माध्यमिक व उच्च स्तर असे त्रिस्तरीय करण्याची शिफारस केली. तसेच उच्च शिक्षणासाठी भारतात विद्यापीठ स्थापनेचीही तरतूद केली.[१]

वुडच्या खलित्यामधील तरतुदींन्वये भारतात प्रथमच १८५७ साली कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन विद्यापीठांची स्थापना होवून उच्च शिक्षणाला सुरूवात झाली.[२]

१९ व्या शतकाचा उत्तरार्ध हा शैक्षणिक बाबतीत महाराष्ट्रात विशेषत: कोल्हापूर शहराबाबत महत्त्वाचा ठरला. या काळात शिक्षणविषयक विकासाला प्राधान्य देवून अनेक खाजगी शाळा उघडण्यास प्रारंभ झाला.

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख शहर असून, ते अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. महालक्ष्मीचे प्राचीन निवासस्थान, दक्षिण

काशी, शिक्षणाचे माहेरघर, गुळाची प्रसिद्ध बाजारपेठ, कुस्तीगिरांचे आगर, कुशल कारागिरांचे तसेच कलाकारांचे 'कलापूर' अशी त्याची अनेक अंगे आहेत. त्यातच भर म्हणून कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून तर शहराचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात कोल्हापूरची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी, धार्मिक महत्त्व, शैक्षणिक विकास आणि शिवाजी विद्यापीठाची स्थापना याबाबत चर्चा केलेली आहे.

## कोल्हापूरचे भौगोलिक स्थान :

कोल्हापूर शहर सह्याद्रीच्या पूर्वेकडील मावळच्या पट्टयात पंचगंगा नदीच्या दक्षिण तीरावर १६°४२' उत्तर अक्षांश व ७४°१४' पूर्व रेखांशावर वसलेले आहे. शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची १,८७० फूट इतकी आहे.[३] आज एकविसाव्या शतकात ते एक प्रमुख औद्योगिक नगर म्हणूनही पुढे येत आहे. तसेच लोहमार्ग व रस्तेमार्गाने शहर देशातील इतर भागांशी जोडलेले आहे.

इसवी सन १९६० नंतर पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानचा भाग हा, कोल्हापूर जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शाहूवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, बावडा, राधानगरी, करवीर, कागल, गडहिंग्लज, आजरा, भुदरगड व चंदगड असे, एकूण १२ तालुके आहेत. कोल्हापूर जिल्हा सह्याद्रीच्या कडा, उत्तरेकडे वारणा नदी, पूर्वेकडे अंशत: कृष्णा नदी व कर्नाटकातील बेळगाव जिल्हा तर दक्षिणेकडे बेळगाव जिल्हा आहे.[४]

कोल्हापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ८,०४७ चौ.किमी असून त्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १६० किमी व पूर्व–पश्चिम रूंदी ६० किमी आहे.[५] हवामानदृष्ट्या मार्च, एप्रिल व मे हे महिने वगळता वर्षभर कोल्हापूरचे हवामान समशितोष्ण आणि निरोगी असते.[६]

## शेती आणि पिके :

कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिमेकडील भाग डोंगराळ व जास्त पर्जन्याचा असल्याने तेथे दाट जंगले आढळतात; तर मध्य व पूर्वेकडील भागात नदीकाठी समतल जमीन असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात शेती होते. कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ७,०४,०१३ हेक्टर (१७,३९,६१९ एकर) असून त्यापैकी ३,९२,१७७ हेक्टर (९,६९,०५८ एकर) जमीन शेतीखाली आहे; आणि सुमारे एक लक्ष हेक्टर भूमी शेती योग्य ओसाड जमीन किंवा पडीक जमीन आहे. अर्थातच अशा पडीक जमिनीचे प्रमाण पश्चिम भागात जास्त आहे. जिल्ह्यातील एकूण शेतीखालील क्षेत्रफळापैकी सुमारे ५८ टक्के भाग पूर्व व मध्यभागात आढळतो.[७]

जमिनीचा उंचसखलपणा हवामान व जमीन प्रकार यानुसार जिल्ह्यामध्ये अनेक प्रकारची पिके होतात. भात हे जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाचे पीक असून अन्नधान्याखाली असलेल्या एकूण जमिनीपैकी सुमारे २/५ भागात भाताचे उत्पादन घेतले जाते.[८] यांशिवाय कडधान्ये, ज्वारी, बाजरी, भुईमूग, गहू इ. अन्नधान्याचेही उत्पादन घेतले जाते. याचबरोबर जिल्ह्यातील शेतकरी अलीकडील काळात आधुनिक पद्धतीचा वापर करून नवनवीन पिकांचे उत्पादन घेत आहेत.

## 'कोल्हापूर' या संकल्पनेची सांस्कृतिक पार्श्वभूमी :

कोल्हापूर महाराष्ट्राच्या इतिहासात व भूगोलात चमकत आहे. कोल्हापूर शहरास कोल्हापूर हे नाव कसे पडले यासंबंधी विविध मते आहेत. कोल्हापूर हे पंचगंगेच्या तीरावर वसलेले गाव व झपाट्याने वाढत जाणारे शहर आहे. गावाच्या नावातच इतिहास दडलेला असतो. या ठिकाणाला कोल्हापूर हेच नाव कसे पडले यामागील काही घटना प्रसंग पाहणे आवश्यक आहे.

कोल्हापूर या नावाचा इतिहास अतिशय मनोरंजक आहे. पुराणातील मतानुसार महालक्ष्मी देवीने आपल्या खुराने स्वत:चे निवासस्थान

महापूरातून वर उचलून स्थिर केले. यावरूनच 'करवीर' हा शब्दप्रयोग आला असावा व करवीरचेच पुढे कोल्हापूर असे नामकरण झाले असावे, असे ग्रॅहम या इतिहासकाराने लिहून ठेवले आहे.[१०]

प्राचीन काळी या क्षेत्रात कोल्लासुर नावाचा राक्षस राहत होता. त्याचा पराभव करून त्याला नगराबाहेरील टेकडीवर ठार करण्यात आले होते. त्यावरून या नगरास 'कोल्लापूर' हे नाव पडले. कालांतराने कोल्लापूरचे कोल्हापूर झाले.[११]

कोल्ल, खोल्ल या शब्दांचा अर्थ नदीचे खोरे किंवा खोलगट भाग असा होतो. कोल्हापूर पंचगंगा नदीच्या काठी खोलगट भागात वसलेले आहे. यावरूनही या नावाचा उगम झाला असावा असाही एक मतप्रवाह आहे.[१२]

कोल्हापूर लगतचा पन्हाळा किल्ला हा काही काळ कोल्हापुरकरांची राजधानी म्हणून प्रसिद्ध होता. डोंगरी किल्ले कोल्हापूर जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत भौगोलिक परिस्थितीचा ठसा दिसतो.

## कोल्हापूरचे धार्मिक महत्त्व :

भारतवर्षात जी अनेक धार्मिक पावन क्षेत्रे आहेत; त्यामध्ये प्रामुख्याने गणना केले जाणारे 'कोल्हापूर' हे परमपावन असे प्राचीन क्षेत्र आहे. प्राचीन काळी लिहिलेल्या पद्मपुराणातील करवीर खंडात कोल्हापूर क्षेत्राचे महात्म्य सविस्तरपणे वर्णन केलेल आहे. प्राचीन काळापासून या क्षेत्राला दक्षिण काशी असेही म्हटले जाते. महालक्ष्मी मंदिरामुळे कोल्हापूर शहर ऐतिहासिक काळापासून एक धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणूनही प्रसिद्ध आहे.[१३]

महालक्ष्मी मंदीर हे हिंदू वास्तूशिल्पकलेचे एक सुबक सुंदर उदाहरण आहे. या मंदिराचा चौथरा ताराकृती असून मंदिराचे गर्भागार कर्णदेव या चालुक्य राजाच्या सुभेदाराने इ.स. ६३४ मध्ये बांधले. तर मारसिंह या शिलाहार राजाने या मंदिराची कलापूर्ण वाढ केली. तसेच गराडदित्य या दुसऱ्या चालुक्य राजाने मंदिरावर कळस चढविला.[१४]

यादव राजांनी मुख्य मंदिरास महाकाली व महासरस्वती या देवतांची मंदिरे इ.स. १२१८ च्या सुमारास जोडली. त्याचपद्धतीने महालक्ष्मीच्या प्रांगणात अनेक देवतांची, लहानमोठ्या देवळांची ओळच्या ओळ लागलेली दिसते. महालक्ष्मीचे देऊळ व आवारातील लहानमोठी अन्य देवतांची देवळे जशी कोल्हापूरच्या मध्यभागात आहेत तशीच शहराच्या इतर भागातही चारी दिशांना आहेत.[१६]

कोल्हापूर शहराच्या वायव्येस सात मैलावर ३,१०० फूट उंचीच्या डोंगरावर वाडी रत्नागिरी येथे जोतीबाचे प्रसिद्ध मंदीर आहे.[१७] पन्हाळा किल्ल्यावरील पराशर गुहा, रत्नागिरीवरील पांडवदरा येथील लेणी, पावनगडावरील मार्कंडेय गुहा, विशाळगडावरील मुकुंद गुहा, जोतिबाच्या डोंगराजवळील पोवळ्याची लेणी, इत्यादि ठिकाणेही धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची असून प्रेक्षणिय आहेत.[१८]

**ऐतिहासिक परंपरा :**

कोल्हापूरचा इतिहास प्राचीन तसाच गौरवशालीही आहे. कोल्हापूर हे अनादीकाळापासून एक शक्तीपीठ म्हणूनही प्रख्यात आहे. पौराणिक इतिहासाचा संदिग्ध कालखंड सोडला तरी सातवाहन काळापासून या नगरीच्या इतिहासाचे अखंड सूत्र दाखविण्याइतका पुरावा आता उपलब्ध झाला आहे.

कोल्हापूर या नगराची पहिली वसाहत जवळजवळ दोन हजार दोनशे वर्षांपूर्वी पंचगंगा नदीच्या तीरावर ब्रम्हपुरी या ठिकाणी झाली. अनेक धर्म संप्रदायांनी कोल्हापूरच्या भूमीचा आश्रय घेवून आपापली कार्यक्षेत्रे उभारली.[१९] तिसऱ्या शतकातील कृष्णराज सातवाहन हा येथील पहिला ज्ञात राजा. सातवाहनानंतर चालुक्य, शिलाहार, यादव या घराण्यांनी इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत या भागावर राज्य केले. दिल्लीच्या सुलतानांच्या अंमलाखाली काही काळ हा प्रांत होता. पुढे बहामनी राज्याचा एक घटक हा प्रांत बनला.[२०]

इ.स. १४९८ मध्ये बहामनी राज्याच्या अस्तानंतर विजापूरच्या आदिलशाहीकडे कोल्हापूर गेले. त्यानंतर इ.स. १६३६ मध्ये शहाजहान याने हा प्रदेश दिल्लीच्या मुघल साम्राज्याला जोडला. परंतु लगेचच तो आदिलशहाला परत केला. पुढे इ.स. १६५९—६० मध्ये छत्रपती शिवाजींनी पन्हाळा व आसपासचा प्रदेश जिंकला. पुढे आदिलशहा, मराठे व मुघल यांच्याकडे अधून मधून हा भाग फिरत राहिला. औरंगजेबाच्या मृत्युनंतर (१७०७) पन्हाळा किल्ला व आसपासचा प्रदेश पुन्हा मराठ्यांच्या हातात आला.[२१]

छत्रपती शिवाजी महाराजांचे दोन पुत्र छत्रपती संभाजी महाराज (१६८०—८९) व छत्रपती राजाराम महाराज (१६८९—१७००) यांच्यानंतर संभाजीपुत्र शाहू व राजाराम पत्नी ताराबाई यांच्यात सत्तेसाठी संघर्ष झाला. यामध्ये संभाजीपुत्र शाहू यशस्वी झाले व त्यांनी सातारा येथे स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला. तर ताराबाईनी १७१० मध्ये पन्हाळ्याला येवून छत्रपतींच्या स्वतंत्र गादीची स्थापना करून आपला अल्पवयीन पुत्र शिवाजी (पहिले) याच्या छत्रपतीपदाची द्वाही फिरवून स्वतःच्या हातात राज्यकारभार घेतला.[२२]

ताराबाई व शिवाजी राजे (पहिले) यांना १७१४ साली कैदेत टाकून शिवाजी (पहिले) चे सावत्र बंधू संभाजीराजे (१७१४—१७६०) हे कोल्हापूरच्या गादीवर आले.[२३] पुढे १७३१ मध्ये संभाजीराजे व साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज यांच्यातील वारणेच्या तहाने दोन्ही छत्रपतींनी एकमेकांच्या सत्तेला मान्यता दिली.[२४] छत्रपती संभाजीराजे २० डिसेंबर १७६० रोजी निपुत्रिक मरण पावल्याने खानवटकर—भोसले घराण्यातील पुत्र दत्तक घेवून शिवाजी (दुसरे) (१७६२—१८१२) या नावाने २७ सप्टेंबर १७६२ रोजी कोल्हापूरचे छत्रपती बनले.[२५] छत्रपती दुसरे शिवाजी यांनी आपल्या कारकिर्दीत १७८८ मध्ये करवीरांची राजधानी पन्हाळ्याहून कोल्हापूरास आणली.[२६] त्याच्यानंतर त्यांचे जेष्ठ पुत्र शंभू महाराज (१८१२—१८२१) कोल्हापूरचे छत्रपती बनले.[२७]

शंभू महाराजांच्या हत्तेनंतर त्यांचे बंधू छत्रपती शहाजी (१८२१–१८३७) हे कोल्हापूरच्या गादीवर आले.[२८] शहाजी महाराजांनंतर त्यांचे पुत्र शिवाजी तिसरे (१८३७–१८६६) हे छत्रपती बनले.[२९] त्यांच्या पश्चात त्यांच्या बहिणीचा मुलगा नागोजीराव पाटणकर हा छत्रपती राजाराम (दुसरा) (१८६६–१८७०) म्हणून गादीवर आला.[३०] त्यांच्या निधनानंतर खानवटकर–भोसले घराण्यातील दत्तक पुत्र शिवाजी (चौथे) (१८७०–१८८३) या नावाने कोल्हापूरच्या गादीवर आले.[३१]

शिवाजी (चौथे) च्या मृत्युनंतर कागलकर घाटगे घराण्यातील पुत्र यशवंतराव हे दत्तक येवून छत्रपती शाहू (१८८४–१९२२) या नावाने छत्रपती बनले.[३२] या शाहू महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात प्रगती झाली. राजर्षी शाहूनंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज (तिसरे) (१९२२–१९४०) गादीवर आले.[३३] त्यानंतर चावरेकर भोसले घराण्यातील प्रतापसिंह यांना दत्तक घेवून शिवाजी (पाचवे) (१९४२–१९४४) म्हणून सत्तेवर आले.[३४] पुढे राजर्षी शाहूंचे नातू व आक्कासाहेबांचे चिरंजीव शहाजी महाराज (१९४७–१९४९) म्हणून कोल्हापूरचे छत्रपती बनले.[३५] हेच कोल्हापूर संस्थानचे अखेरचे छत्रपती होत.

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. नव्या काळाला अनुसरून भारतातील संस्थांनी प्रदेश स्वतंत्र भारतात सामील व्हावे अशी अपेक्षा व्यक्त होवू लागल्यामुळे सर्व संस्थाने भारतात विलीन झाली. कोल्हापूर हे संस्थानही ३१ मार्च १९४९ ला भारतात विलीन झाले. महाराणी ताराबाईंनी स्थापन केलेल्या राज्याचे सुमारे २५० वर्षाच्या इतिहासाचे शेवटचे प्रकरणही संपले. कोल्हापूरच्या गादीवर कोल्हापूरच्या राजघरण्याच्या क्रमश: वारसांबाबत थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## कोल्हापूरचे राजघराणे :

- संस्थापक महाराणी ताराबाई : १७१०
- छत्रपती शिवाजी पहिले : १७१०—१७७४
- छत्रपती संभाजीराजे (छत्रपती शिवाजी पहिले सावत्र भाऊ) : १७१०—१७१४
- छत्रपती शिवाजी दुसरे (खनवटकर—भोसले घराण्यातील दत्तक) : १७६२—१८१२
- शंभू महाराज (शिवाजी दुसरेचे पुत्र) : १८१२—१८२१.
- शहाजी महाराज (शंभू महाराजांचे बंधू) : १८२१—१८३७
- शिवाजी तिसरे (शहाजी महाराजांचे चिरंजीव) : १८३७—१८६६
- राजाराम दुसरे (शिवाजी तिसरेच्या बहिणीचा दत्तक मुलगा नागोजीराव पाटणकर) : १८६६—१८७०
- शिवाजी चौथे (खनवटकर—भोसले घराण्यातील दत्तक) : १८७०—१८८३
- शाहू महाराज (कागलकर घाटगे घराण्यातील दत्तक घेतलेला पुत्र यशवंत) : १८८४—१९२२
- राजाराम तिसरे (शाहू महाराजांचे पुत्र) : १९२२—१९४०
- शिवाजी पाचवे (चावरेकर घराण्यातील दत्तक प्रतापसिंह) : १९४२—१९४४
- शहाजी महाराज (राजर्षी शाहू महाराजांचे नातू व अक्कासाहेबांचे चिरंजीव) : १९४७—१९४९

## कोल्हापूरचा शैक्षणिक विकास :

भारताला थोर अशी प्राचीन शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. पूर्वीच्या काळी भारतात वेदांवर आधारित अशी धार्मिक शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. आधुनिक काळात इंग्रजी राजवटीत स्वत:च्या अधिकाऱ्यांना मराठी शिकता यावे व मराठ्यांना इंग्रजी शिकता यावे

यासाठी इंग्रजांनी प्रयत्न केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण सर्वांना खुले केले. त्यामुळे कोल्हापूरातही शिक्षणाची नवप्रभात उजाडली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीच्या उदारमतवादी धोरणामुळे सर्वसामान्य लोकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हळूहळू बदलू लागला. कोल्हापूर संस्थांनातही शिक्षणाचा प्रसार सुरू झाला. शैक्षणिक विकासाच्या चळवळीत हे शहर नेहमीच इतरांना मार्गदर्शक ठरले आहे. यास्तव कोल्हापूरातील शैक्षणिक प्रगती व विकास पाहणे आवश्यक आहे. कोल्हापूर संस्थानच्या शिक्षण विषयक स्थितीचा आढावा घेताना, छत्रपती शाहूपूर्व काळातील शिक्षण व छत्रपती शाहूकालीन शिक्षण व्यवस्थेचा मागोवा घ्यावा लागेल.

## छत्रपती शाहूपूर्वकालीन कोल्हापूर संस्थानचा शैक्षणिक विकास :

शाहू महाराज १७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या गादीवर बसले. शाहूपूर्वी जवळ—जवळ ४०—५० वर्षापर्यंत कोल्हापूर संस्थानाला कोणी स्थिर आणि समर्थ असा राजा लाभला नव्हता. त्यामुळे संस्थानची शैक्षणिक प्रगती असमाधानकारक अशीच राहिली होती.

शाहूपूर्व काळात छत्रपती शिवाजी (तिसरे)(१८३७—१८६६) आणि राजाराम महाराज (१८६६—१८७०) यांनी कोल्हापूर संस्थानातील शिक्षण क्षेत्रात काही चांगल्या सुधारणा केल्या. शिवाजी (तिसरे) महाराजांच्या काळात प्रथमच सरकारी खर्चातून शिक्षण देण्याचे कार्य सुरू झाले. शिवाजी (तिसरे) महाराजांच्या प्रयत्नाने कोल्हापूरात पहिली इंग्रजी शाळा १८५१ मध्ये सुरू झाली.[३६] त्याचबरोबर संस्थानातील पन्हाळा, कागल, आळते, मलकापूर, बावडा, शिरोळ, गडहिंग्लज, आणि भुदरगड या आठ महालात मराठी शाळा सुरू झाल्या. तसेच इसवी सन १८५३ साली पहिली मुलींची शाळा सुरू केली.[३७] शिवाजी (तिसरे) महाराजांच्या प्रयत्नाने सरकारी शाळांची संख्या वाढू लागली. या शाळांच्या प्रशासनासाठी श्री. नारायण रामचंद्र करंदीकर यांची नियुक्ती छत्रपतींनी केली. सन १८५४—१८५५ मध्ये एकूण २४ सरकारी शाळांतून ३९९ विद्यार्थी शिकत होते. छत्रपती शिवाजी (तिसरे) महाराजांनी या सरकारी शाळांव्यतिरिक्त खाजगी शाळांनाही


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रोत्साहन दिले. त्यानंतर १८६३ साली सरदारांच्या मुलांसाठीही एक स्वतंत्र शाळा कोल्हापूरात सुरू झाली.[३८] १८६६ साली शिवाजी (तिसरे) यांच्या नंतर छत्रपती म्हणून राजाराम महाराज यांनी संस्थानची अधिकार सूत्रे हाती घेतली. तेही शिक्षण प्रसाराबाबत आग्रही होते. त्यांनी १८६७ मध्ये कोल्हापूरात पहिले हायस्कूल उघडून श्री. मोरेश्वर कुंटे यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक केली. सन १८७० साली या हायस्कूलमध्ये २५३ विद्यार्थी शिकत होते.[३८]

करवीर छत्रपतींच्या प्रयत्नानंतरही कोल्हापूरची शैक्षणिक प्रगती ही फक्त श्रीमंत व उच्च वर्गांपुरतीच मर्यादित राहीली होती. तरीही शिक्षणाच्या कार्यात मोठ्या आस्थेने करवीर छत्रपतींनी जे शैक्षणिक कार्य केले ते समाजोपयोगी ठरले.

## छत्रपती शाहूकालीन कोल्हापूर संस्थानचा शैक्षणिक विकास :

बहुजन समाजाला शिक्षण मिळावे म्हणून भगीरथ प्रयत्न करणारे महात्मा जोतीराव फुले यांचा फार मोठा प्रभाव शाहूंवर पडला.

ब्रिटीशांच्या शैक्षणिक धोरणाचा फायदा केवळ उच्च वर्गालाच मिळत असल्याने प्रथम महात्मा जोतीराव फुलेंच्या लक्षात आले. त्यांनी व सावित्रीबाई फुलेंनी शिक्षण क्षेत्रात एक क्रांती घडवून आणली. बहुजन समाजाबरोबरच स्त्रियांनाही शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजाची प्रगती करण्यासाठी शिक्षणाची कशी गरज आहे हे मोठ्या मार्मिक आणि सूत्रबद्ध शब्दांत सांगताना फुले म्हणतात —

"विद्येविना मती गेली।
मतीविना नीती गेली।।
नीतीविना गती गेली।
गतीविना वित्त गेले।।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"[४०]

तीन मडक्यांच्या गाळणी तत्त्वाप्रमाणे वरच्या वर्गातून झिरपत झिरपत शिक्षण समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत येईल ही इंग्रजांची भूमिका त्यांना मान्य नव्हती. राष्ट्रीय शिक्षणाचाच त्यांनी पुरस्कार केला. महात्मा फुलेंनी लावलेली 'ज्ञानज्योत' जेव्हा मंदावत चालली होती, तेंव्हा शाहू महाराज पुढे सरसावले. आपला देश आणि आपला समाज सर्वतोपरी उन्नत व्हावा, ही महत्त्वकांक्षा आपल्या उराशी बाळगून शाहू महाराजांनी सार्वजनिक शिक्षण कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

गरीब, दुर्लक्षित, दुर्बल, दलित, हीन—दीन, पिडीत असा कष्टकरी बहुजन समाज अज्ञानाच्या अंध:कारात असतानाच २ एप्रिल, १८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती घेतली, त्यावेळी करवीर राज्याची शैक्षणिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. संस्थानची तत्कालिन एकूण लोकसंख्या ९,१०,००० होती. त्यापैकी १४,८१९ विद्यार्थी २२४ शाळांमधून शिक्षा घेत होते. म्हणजेच लोकसंख्येच्या फक्त १.६२ टक्के लोकच शिक्षणार्थी होते तर शिक्षणावरील सरकारचे खर्चाचे प्रमाण हे फक्त ३.७५ टक्के एवढेच होते.[४१]

राजर्षी शाहू महाराज मागील काळातील शिक्षण विषयक परिस्थितीचे चित्र रेखाटताना म्हणाले होते की; "शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. केवळ एकच जात विद्येचा उपभोग घेत होती. मनू आणि त्याच्यामागून आलेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या धोरणाला अनुसरून निरनिराळ्या जातीच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध घालून आमच्या जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद केले."[४२]

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाएवढे प्रभावी दुसरे माध्यम नाही, हे छत्रपती शाहूंना उमगले होते. म्हणूनच शिक्षणातून सामान्यांना नवी चेतना मिळावी, नवी दिशा—दृष्टी मिळावी, नवीन ध्येय—ध्यास मिळावेत, नवनवीन शोध लागावेत; यासाठीच राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाचा कर्मयज्ञ सुरू केला. एक राजा प्रजेच्या शिक्षणासाठी

अहोरात्र झटतो, हे भारतीय राजे लोकांच्या परंपरेतील पहिलेच उदाहरण आहे असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

**छत्रपती शाहू व वसतिगृह चळवळ :**

मागासलेल्या अज्ञानी बहुजन समाजात एकूण शिक्षणाविषयी मोठी अनास्था होती. त्यांच्यात उच्च शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांनी सन १८९६ मध्ये सर्व जाती—धर्माच्या विद्यार्थ्यांना खुले असणारे एक अभिनव वसतिगृह सुरू केले.[४३]

इसवी सन १८९९ च्या डिसेंबर महिन्यात संस्थानातील मलकापूर जहागिरीमधील सरूड वडगांव या खेड्यातील शेतकरी कुटुंबातील पांडुरंग चिमणाजी पाटील हा कोल्हापूरातील राजाराम हायस्कूलचा विद्यार्थी उत्तमरित्या मॅट्रीकची परीक्षा पास झाल्याची बातमी शाहू महाराजांना समजली, तेव्हा त्यांना मराठी कुटुंबातील मुलगा मॅट्रीक झाल्याचा खूप आनंद झाला. महाराजांनी पांडुरंग चिमणाजीस पन्हाळ्यावर भेटीस बोलाविले. त्या भेटीत त्यांना समजले की, तो कुठेतरी सरकारी तालमीत झोपत असे. त्याला धड अभ्यासालाही जागा नव्हती. छत्रपती शाहूंनी पांडुरंग चिमणाजी (पुढे ते रावबहादूर पी. सी. पाटील म्हणून नामांकित झाले.) याच्या तोंडून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी होणारी कुतरओढ, हालअपेष्टा ऐकल्या आणि या घटनेनंतर विशिष्ट जातीची शिक्षणातील मक्तेदारी नष्ट करण्यासाठी बहुजनांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जातवार वेगळे वसतिगृह सुरू करण्याची कल्पना त्यांना सुचली. पुढे त्यांनी १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा जातीच्या मुलांसाठी 'महाराणी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' नावाचे वसतिगृह उभारले.[४४] त्यानंतर शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या पुढाऱ्यांना बोलावून वसतिगृह सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यासाठी हव्या असणाऱ्या इमारती, पैसा आणि उत्पन्नाची साधने यांची पूर्ण तरतूदही केली. त्यामुळे १९०१ ते १९२२ पर्यंत कोल्हापूर शहरात वेगवेगळ्या जाती धर्माची स्वतंत्र अशी २२ वसतिगृहे निर्माण झाली.[४५]

कृषितज्ञ डॉ. पी. सी. पाटील, पंजाबचे गर्व्हनर रँग्लर डी. सी. पावटे, शिक्षण तज्ञ जे. पी. नाईक, लोकनेते बाळासाहेब देसाई यांसारख्या शेकडो व्यक्ती कोल्हापूरातील शाहू महाराजांच्या वसतिगृहातून शिकून पुढे येवून विविध क्षेत्रात चमकल्या. या वसतिगृहांमुळे महाराष्ट्रात मुंबई, पुण्याखालोखाल कोल्हापूर हे विद्याभ्यासाचे केंद्र म्हणून पुढे आले.[४६]

**छत्रपती शाहू महाराज व प्राथमिक शिक्षण :**

शिक्षणाशिवाय कनिष्ठ वर्गाची प्रगती होणार नाही. हे जाणून महात्मा फुले यांनी प्रथम बहुजनांसाठी शाळा काढल्या. त्याचबरोबर ब्रिटीश सरकारने १२ वर्षाच्या आतील मुला—मुलींना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण द्यावे असा हंटर कमिशनपुढे अर्ज केला होता. तर फुल्यांनंतर नामदार गोखल्यांनी १९१० च्या केंद्रिय मंत्रीमंडळात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा ठराव मांडला. याव्यतिरिक्त प्राथमिक शिक्षणाबाबत फक्त राजर्षी शाहू महाराज हेच आग्रही होते.[४७]

बहुजनांना निदान प्राथमिक शिक्षण तरी लाभावे या दृष्टीकोनातून छत्रपती शाहूंनी अनेक शैक्षणिक प्रयोग राबविले. अगदी प्रथम त्यांनी २० मे, १९११ रोजी १५ टक्के विद्यार्थ्यांना संपूर्ण फी माफ करण्याचा निर्णय घेतला. परंतु याचा फायदा केवळ सुशिक्षित जातींच्या विद्यार्थ्यांना होत आहे, हे लक्षात आल्यावर त्यांनी त्या १५ टक्के विद्यार्थ्यांमध्ये निम्मे विद्यार्थी हे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील असले पाहिजेत असा नियम केला.[४८]

सन १९१२ साली कोल्हापूर संस्थानातील प्रत्येक खेड्यात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमण्याची योजना सुरू केली. वतनी जमिनी मिळविण्यात अडचणी आल्यामुळे महाराजांनी १९१४ मध्ये पगारी शिक्षक नेमले. पुढे वतनी जमिनी उपलब्ध होताच पगारी योजना महाराजांनी रद्द करून वतनी शिक्षक नेमले. नंतर १९१७ पासून महाराजांनी वतनदार शिक्षक पद्धत बंद करून पुन्हा पगारी शिक्षक योजना सुरू केली.[४९] ३० सप्टेंबर, १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात मोफत आणि

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. ४ मार्च, १९१८ रोजी चिखली गावी पहिल्या नव्या सक्तीच्या प्राथमिक शाळेचे उद्घाटन करून शाहू महाराजांनी या योजनेचा शुभारंभ केला.[५०] सन १९१८ साली सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेअंतर्गत २७ शाळांमधून १,२९६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर १९२२ साली शाळांची संख्या वाढून ४२० झाली तर त्यामध्ये २२,००७ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत होते.[५१]

## राजर्षी शाहू महाराज आणि दुय्यम व उच्च शिक्षण :

'आधी पाया मग कळस' या उक्तीप्रमाणे शिक्षणाच्या इमारतीचा पाया मजबूत करण्यासाठी छत्रपती शाहूंनी प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले होते. परंतु त्याचबरोबर त्यांनी दुय्यम आणि उच्च शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले नाही. 'लोकशिक्षण हा लोकशाहीचा पाया आहे' हे तत्त्व राजर्षी शाहूंनी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत पाळले.

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजातील होतकरू तरूणांना उच्च शिक्षणासाठी देणग्या व शिष्यवृत्त्याच्या रूपाने वेळोवेळी साहाय्य केले. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर पी. सी. पाटील यांची उदाहरणे इतिहासप्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे थोर शिक्षणतज्ज्ञ प्रि. सी. आर. तावडे यांना अमेरिकेतील उच्च शिक्षणाला व भाई माधवराव बागल यांना मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये शिकण्यासाठी शाहू महाराजांनी मदत केली आहे.[५२] तसेच १९१४ साली एक व १९२० साली तीन विद्यार्थ्यांना महाराजांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविल्याचा उल्लेख आहे.[५३] याशिवाय कला, कायदा, तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध विषयांत उच्च शिक्षण घेणाऱ्या संस्थानातील तसेच संस्थानाबाहेरील विद्यार्थ्यांनाही महाराजांनी देणग्या व शिष्यवृत्त्या दिलेल्या आढळतात.

प्राथमिक शिक्षण देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. असे समजूनच राजर्षी शाहू महाराजांनी त्यांची अंमलबजावणी केली, परंतु त्याचबरोबर कोल्हापूरातील राजाराम हायस्कूल, राजाराम महाविद्यालयाकडेही दुर्लक्ष केले नाही. कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातले एक प्रमुख शैक्षणिक

केंद्र बनावे अशी शाहू महाराजांची इच्छा होती. म्हणूनच आर्थिक टंचाईच्या काळातही शाहू महाराजांनी राजाराम कॉलेज सुरू ठेवले होते. राजाराम महाविद्यालयामध्ये सन १९१९ मध्ये शेकडा १४ विद्यार्थी ब्राम्हणेत्तर होते तर सन १९२२ मध्ये २६३ विद्यार्थ्यांमध्ये एकूण १०० विद्यार्थी ब्राम्हणेत्तर होते.[५४]

शाहू महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुखांपर्यंत अनेक शिक्षण प्रसारकांनी सर्व महाराष्ट्रात बहुजन समाजाला समर्थ बनविणाऱ्या ज्ञानगंगेचे पाट रयतेच्या झोपडीपर्यंत पोहचविले. अशाप्रकारे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सुरू केलेली प्राथमिक, दुय्यम आणि उच्च शिक्षणाची सरिता ही पुढे जाऊन शिक्षणसागर बनली. यामध्ये शाहू महाराजांच्या प्रेरणेचा खूप मोठा वाटा आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या शैक्षणिक विकासाला चालना दिली. त्यांच्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनीही त्यांचे हे धोरण पुढे चालविले. कोल्हापूर बरोबरच आजूबाजूच्या सातारा, सांगली, सोलापूर, बेळगाव, रत्नागिरी, विजापूर अशा शेजारच्या जिल्ह्यातून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणारे कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख केंद्र होते. पुढे कोल्हापूर येथे १९६२ साली शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली व तो शाहू महाराजांच्या कार्याचा उत्तरार्धच ठरला.

## शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा इतिहास :

आज कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठ मोठ्या दिमाखाने उभे आहे. कला, विज्ञान, वाणिज्य, वैद्यक, तांत्रिक शिक्षण इत्यादी विविध शाखांतील उच्च शिक्षण देणारी असंख्य महाविद्यालये या विद्यापीठाच्या कक्षेत मोठ्या जोमाने शिक्षण प्रसाराचे काम करीत आहेत. जवळ—जवळ अर्ध शतक ओलांडलेल्या प्राथमिक शाळाही अनेक आहेत. या विद्यापीठरूपी ज्ञानवृक्षाची मुळे चांगली खोलवर रूजलेली आहेत. अगणित

शाखांनी हा वृक्ष बहरलेला आहे. परंतु प्रतिकूल परिस्थितीत हा वृक्ष लावण्याचे कार्य ज्यांनी केले त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

सन १८५४ च्या वुडच्या खलित्यामुळे भारतात उच्च शिक्षणाला गती मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळात जुन्या मुंबई राज्याच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी ही सन १८५७ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठावर होती. सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मुंबई राज्यासाठी मुंबई विद्यापीठ हेच एकमेव विद्यापीठ होते. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मुंबईसह पश्चिम महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक व संपूर्ण गुजरात एवढ्या विशाल भागात होते.

पुढे स्वातंत्र्यानंतर मुंबई विद्यापीठाचा व्याप वाढल्यामुळे प्रशासकीय सोयीसाठी प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करण्याचे ठरले. त्याप्रमाणे गुजरातसाठी अहमदाबाद येथे, उत्तर कर्नाटकसाठी धारवाड विद्यापीठाची स्थापना सन १९४८ मध्ये करण्यात आली. तर मुंबई येथे फक्त मुलींसाठी असे महिला विद्यापीठ १९४९ साली स्थापन करण्यात आले.[५५]

राज्यपुनर्रचनेच्या धोरणानुसार ता. १ नोव्हेंबर १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली. या द्विभाषिक मुंबई राज्यात मुंबईसाठी मुंबई विद्यापीठ (१८५७), विदर्भातील आठ जिल्ह्यांसाठी नागपूर विद्यापीठ (१९२५), पश्चिम महाराष्ट्रातील तेरा जिल्ह्यांसाठी पुणे विद्यापीठ (१९४८), संपूर्ण गुजरातसाठी अहमदाबाद येथील विद्यापीठ (१९४९), फक्त मुलींसाठीचे मुंबई येथील महिला विद्यापीठ (१९४९) अशी अशी सहा विद्यापीठे कार्यरत होती.[५६]

तथापी पुढे पुणे विद्यापीठाचा व्याप वाढल्यामुळे नवीन प्रादेशिक विद्यापीठाची गरज वाटू लागली. त्यावेळीच कोल्हापूर येथे नवीन विद्यापीठाची मागणी जोर धरू लागली होती. कोल्हापूरला एखादे विद्यापीठ स्थापन करावे असे अनेकांना वाटत होते. त्या विद्यापीठाला छत्रपती

शिवाजी महाराजांचे नाव देण्याचे नक्की झाले होते. कोल्हापूर येथे विद्यापीठाची स्थापना होण्यासाठी येथील जनतेने खूप परिश्रम घेतले.

**विद्यापीठ स्थापनेचे स्थापनेचे स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रयत्न :**

कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापनेची कल्पना फार जुनी आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य बहुजनांना शिक्षण मिळावे म्हणून खर्च केले. त्यांची कोल्हापूरला ग्रामीण विद्यापीठ स्थापन्याची महत्वकांक्षा होती.[५७] तर करवीर नगरीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे विद्यापीठ व्हावे ही कल्पना राजाराम कॉलेजचे एक विद्वान व भूतपूर्व प्राचार्य आणि शिवचरित्राचे गाढे अभ्यासक डॉ. बाळकृष्ण यांनी कॉलेजच्या वार्षिक स्नेह संमेलनात सर्वप्रथम १९३१—३२ साली मांडली.[५८] त्यानंतर संधी मिळेल तेव्हा प्रत्येक व्यासपीठावर डॉ. बाळकृष्ण आपल्या विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचा सतत पाठपुरावा करीत राहिले.

डॉ. बाळकृष्ण यांनी आपली विद्यापीठ स्थापनेची कल्पना करवीर छत्रपती राजाराम महाराजांसमोर मांडली. राजाराम महाराजांनीही या कल्पनेला पाठींबा दिला. तसेच विद्यापीठाला आवश्यक अशा अभ्यासशाखा, — 'साईक्स लॉ कॉलेज' (१९३३), 'महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेज' (१९३४) इत्यादी संस्थांची निर्मिती केली.[५९] त्याचबरोबर कोल्हापूरच्या जनतेनेही विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

डॉ. बाळकृष्ण यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू चंदावरकर यांच्या उपस्थितीखाली कोल्हापूर येथे मोठा समारंभ भरविला होता. तेथे त्यांनी विद्यापीठ स्थापनेची निश्चित अशी योजना पुढे ठेवली. चंदावरकर यांनीही या कल्पनेस पाठिंबा दिला.[६०] अशाप्रकारे विद्यापीठ स्थापनेचे प्रयत्न जोमाने करणारे डॉ. बाळकृष्ण हे खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठाचे प्रेरणास्थान होते. तथापि विद्यापीठाचे पुरस्कर्ते डॉ. बाळकृष्ण यांचे ता. २४ ऑक्टोबर १९४० व छत्रपती राजाराम महाराज यांचे २१ नोव्हेंबर १९४० रोजी निधन झाल्याने विद्यापीठ स्थापनेची चळवळ मंदावली.

## विद्यापीठ स्थापनेचे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रयत्न :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने विद्यापीठ शिक्षणाचा विचार करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली “University Education Commission” नावाची समिती नेमली होती. शिक्षणाचे केंद्रीकरण शहरात झाले असल्याने ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ग्रामीण विद्यापीठांच्या स्थापनेचा मुद्दा राधाकृष्णन समितीने सुचविला होता.[६१] त्यानंतर १९५४ मध्ये श्रीमाळी समितीने ग्रामीण विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाचा तपशीलवार मसुदा केंद्र सरकारला दिला होता.[६२] त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात दक्षिण महाराष्ट्रातही विद्यापीठ स्थापनेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. या विद्यापीठ स्थापनेबाबत सभा, मेळावे, चर्चासत्रे सुरू झाली. विद्यापीठ प्रश्नावर लोकभावना हळूहळू तीव्र होत असल्याचे निदर्शनास आल्यावर करवीर नगरपालिकेने विद्यापीठ स्थापनेच्या मुद्द्यावर अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने सुचविलेल्या शिफारशींवर आधारित असे एक निवेदन नगरपालिकेने राज्य सरकारला दिले होते. तथापि सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.[६३] तरीही कोल्हापूरवासियांचे विद्यापीठ स्थापनेचे प्रयत्न चालूच राहिले.

द्विभाषिक मुंबई राज्याचे मुंख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी १९५६–५७ साली सातारा जिल्ह्यातील फलटण येथील एका समारंभात विद्यापीठ स्थापनेच्या कल्पनेचा उल्लेख केला. पुढे कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाच्या एका समारंभातही यशवंतराव चव्हाणांनी विद्यापीठ स्थापनेचा पुनरूच्चार केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे विद्यापीठ स्थापनेच्या प्रयत्नांना जोर चढला.[६४]

पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू रँगलर र. पु. परांजपे यांनी सप्टेंबर १९५६ मध्ये राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात कोल्हापूरच्या शैक्षणिक कामगिरीचा अभिमानाने उल्लेख केला. तसेच कोल्हापूरात विद्यापीठाची स्थापना झाल्यास आपल्याला त्याचे आश्चर्य वाटणार नाही आणि पुणे विद्यापीठास त्याचे दु:खही होणार नाही,

असे परांजपेंनी आपल्या भाषणात म्हटले होते. त्याच्या या वक्तव्यामुळे विद्यापीठ स्थापनेच्या प्रयत्नांना नैतिक बळ प्राप्त झाले.[६५]

सन १९६० साली भाई माधवराव बागल यांनी मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांना कोल्हापूरला विद्यापीठाची मागणी करणारे लेखी निवेदन दिले.[६६] विद्यापीठ स्थापनेची कल्पना ही जनसामान्यांत खोलवर रूजली होती. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे स्फूर्तीस्थान असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे विद्यापीठाच्या स्वरूपात चिरकाल, चिरंतन टिकणारे असे स्मारक करवीर नगरीत उभारावे या विचाराने कोल्हापूरची जनता भारावली होती.

**विद्यापीठ स्थापनेचे महाराष्ट्र राज्य सरकारचे प्रयत्न :**

ता. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नामदार यशवंतराव चव्हाण व पहिले शिक्षण मंत्री म्हणून नामदार बाळासाहेब देसाई यांनी शपथ घेतली. हे दोघेही कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे माजी विद्यार्थी होते. कोल्हापूर येथील वास्तव्यामुळे करवीर वासियांची विद्यापीठ स्थापनेमागील तळमळ ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी विद्यापीठ स्थापनेच्या प्रश्नाकडे आत्मियतेने लक्ष देवून विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना सुरू केली.[६७]

दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर येथे विद्यापीठ स्थापना करण्याचे निश्चित झाल्यानंतर, विद्यापीठ स्थापनेची पूर्वतयारी म्हणून "श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटी" च्या स्थापनेची घोषणा शिक्षणमंत्री मा. बाळासाहेब देसाई यांनी जून १९६१ मध्ये मुंबई आकाशवाणीवरून केली.[६८] तसेच मुंबई येथील पत्रकार परिषदेत मा. शिक्षणमंत्र्यांनी १० जुलै १९६१ रोजी कमिटीतील सदस्यांची नावे जाहीर केली.[६९]

विधिमंडळाच्या अधिवेशनात सरकारने विधानसभेत विद्यापीठ स्थापनेसाठी ५० लाख रूपयांची प्राथमिक तरतूद केल्याची माहिती मा. शिक्षणमंत्र्यांनी ९ ऑगस्ट, १९६१ रोजी दिली.[७०] तसेच शिवाजी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

युनिव्हर्सिटी कमिटीच्या 'टर्म्स ऑफ रेफरन्स' ही सभागृहात सांगितल्या. त्या टर्म्स पुढीलप्रमाणे होत्या.

1) To make recommendation as to the terms, scope, constitution and jurisdiction of University for the southern parts of the Maharashtra state having regard to the area under jurisdiction of Poona University and the facilities of higher education available in that university.
2) To report on the case of establishment and maintenance of university and to make proposals for raising necessary funds, and
3) To make other recommendations germane thereto.[७१]

अशाप्रकारे राज्य सरकारने विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकले.

**श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीची निर्मिती :**

महाराष्ट्र शासनाने 'श्री. छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटी'चे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचे पत्र प्रि. सी. रा. तावडे यांना ४ सप्टेंबर, १९६१ रोजी मिळाले.[७२] तसेच कमिटीचा अहवाल सादर करण्यास चार महिन्यांची मुदत दिलेली होती.

**"श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटी" मधील अकरा सदस्य पुढीलप्रमाणे होते :**

१. प्राचार्य सी. रा. तावडे — अध्यक्ष, कोल्हापूर
२. प्राचार्य डॉ. बी. आर. ढेकणे — सदस्य, राजाराम कॉलेज, कोल्हापूर
३. प्राचार्य डॉ. आर. एस्. मुगळी — सदस्य, विलिंग्डन कॉलेज, सांगली
४. श्री. राजाराम बापू पाटील — सदस्य, सांगली.
५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी — सदस्य, वाई (सातारा)
६. डॉ. बी. एस्. पाटील — सदस्य, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
७. प्राचार्य डॉ. भगवानदास — सदस्य, दयानंद कॉलेज, सोलापूर.
८. प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर — सदस्य, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वेंगुर्ला, रत्नागिरी.

९. प्राचार्य डॉ. बी. एस्. नाईक — सदस्य, राणी पार्वतीदेवी हायस्कूल, सावंतवाडी.

१०.प्रा. ना. सी. फडके — सदस्य, पुणे.

११.श्री. व्ही. ए. आपटे — सदस्य, सचिव, शिक्षण उपसंचालक, पुणे.[७३]

कमिटीने मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ, बडोदा (गुजरात), श्री वल्लभभाई पटेल विद्यापीठ, आनंद (गुजरात), कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक) इत्यादी विद्यापीठांना भेटी देऊन माहिती मिळविली, तसेच महाराष्ट्रातील शिक्षणतज्ञांकडून माहिती घेतली; जनतेची मते आजमावली. त्याचप्रमाणे कमिटीने एकूण १२६ मान्यवरांकडून तोंडी माहिती व ६४६ मान्यवरांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविली.[७४]

कमिटीने दिलेल्या नियोजित वेळी चार महिन्यांत आपला अहवाल सादर केला. कमिटीचे अध्यक्ष प्राचार्य सी. रा. तावडे यांनी ता. ३० जानेवारी १९६२ रोजी आपला अहवाल शिक्षणमंत्री मा. बाळासाहेब देसाई यांना सचिवालयात सादर केल.[७५] कमिटीने आपल्या अहवालात सरकारला विद्यापीठाच्या संदर्भात काही शिफारशींही सुचविल्या.

## श्री छत्रपती शिवाजी युनिव्हर्सिटी कमिटीच्या मुख्य शिफारशी :

### १) विद्यापीठाचा प्रकार :

इतर महाविद्यालयांना संलग्न करून घेणारी, संशोधन करणारी व स्वतः पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण देणारी संस्था असे विद्यापीठाचे स्वरूप असावे.

### २) विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांचा समावेश करावा.

**३) विद्यापीठाची जागा :**

कोल्हापूरच्या दक्षिणेकडील सागरमाळ व राजाराम तलावासह पुणे—बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरच्या दोन्ही बाजूस पसरलेल्या जागेवर विद्यापीठ उभारावे.

**४) विद्यापीठाचे नांव :**

राज्य शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठाचे नांव 'श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' असे ठेवायचे होत, पण असे लांबलचक नाव ठेवले की लोक राष्ट्रपुरूषाच्या नावाचा अपभ्रंश करतात व मुख्य नाव बाजूलाच पडते, तसे होऊ नये म्हणून 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' असे साधे सुटसुटीत नाव ठेवावे.

**५) विद्यापीठाची कार्ये :**

अ) मराठी भोषेच्या व साहित्याच्या, तसेच महाराष्ट्राच्या इतिहासाच्या व संस्कृतीच्या अभ्यासाला प्रोत्साहन देणे.

ब) विद्यापीठ कार्यक्षेत्रातील साधनसंपत्तीचा अभ्यास करणे आणि या क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक त्या सुधारणा उपयोजित संशोधनाद्वारे सुचविणे.[७६]

कमिटीच्या शिफारशीनुसार राज्य सरकारने विद्यापीठाचे नाव 'श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' ऐवजी 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' असे बदलले. त्यानंतर सरकारने 'शिवाजी विद्यापीठाचे' विधेयक विधीमंडळात मांडले. १७ जुलै, १९६२ रोजी विधानपरिषदेने व २४ जुलै, १९६२ रोजी विधानसभेने या विधेयकाला मंजूरी दिली.[७७] ता. १७, ऑगस्ट १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठ विधेयकाचे कायद्यात रूपांतर होवून विद्यापीठ स्थापनेवर शिक्कामोर्तब झाले.[७८]

## शिवाजी विद्यापीठाची स्थापना :

महाराष्ट्र सरकारने शिवाजी विद्यापीठ कायद्यातील काही तरतूदींची ता. १ सप्टेंबर, १९६२ रोजी प्रत्यक्षात अंमलबजावणी केली.

यामुळे कोल्हापुरात विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे पडले.[७९]

ता. ११ सप्टेंबर, १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब पवार यांची नियुक्ती सरकारने केली.[८०] ता. २० सप्टेंबर, १९६२ डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारला.[८१] याचबरोबर दक्षिण महाराष्ट्रात एक स्वतंत्र ग्रामीण विद्यापीठ असावे ही दक्षिण महाराष्ट्रातील जनतेची दीर्घकाळची असणारी इच्छा सफल झाली.

**शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाला सुरूवात :**

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेवेळी शिवाजी विद्यापीठाला स्वत:ची अशी जागा किंवा इमारत नव्हती, त्यामुळे सुरूवातीला विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजासाठी माजी खासदार कै. भाऊसाहेब महागांवकर यांचा बंगला दोन वर्ष भाड्याने घेण्यात आला. याच महागांवकर बंगल्यात (सध्याचे ओपल हॉटेल) ता. ८ ऑक्टोबर, १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचा नोकरवर्ग व कोल्हापूरातील अनेक शिक्षणप्रेमी नागरिक यांच्या साक्षीने दुपारी १२ वाजून ४५ मिनिटांनी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विधीपूर्वक सरस्वती पूजन करून शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाला रीतसर सुरूवात केली.[८२] शिवाजी विद्यापीठाचे कुलपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. सुबरायन यांचे थोड्याच दिवसापूर्वी दु:खद निधन झाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयाच्या प्रारंभानिमित्त सायंकाळी ४ ते ८ पर्यंत निमंत्रितांसाठी पानसुपारीचा असलेला कार्यक्रम मात्र रद्द करण्यात आला.[८३]

**शिवाजी विद्यापीठाचे औपचारिक उद्‌घाटन :**

पंचगंगेला ज्ञानगंगा मिळाली असा तो अमृताने न्हालेला सोनियाचा दिवस अखेर उजाडला. ता. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाचे औपचारिक उद्‌घाटन भारताचे तत्कालिन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले.[८४]

हिंदवी स्वराज्य संस्थापक, राष्ट्रनिर्माते, शककर्ते, युगप्रवर्तक असे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने विद्यापीठ रूपात शिक्षण क्षेत्रात नवीन तारा उदयाला आला. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाळकृष्ण अशा थोर व्यक्तींचे विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न साकार झाले. शिवाजी विद्यापीठाच्या रूपाने सरस्वतीच दक्षिण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अवतरली.

विद्यापीठाच्या शैक्षणिक कामाला ता. ९ जून १९६३ रोजी प्रारंभ झाला. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांचे सुमारे ५५ हजार चौरस किलोमीटर एवढे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र होते. या क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे ८० लाख होती. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रारंभी ३४ महाविद्यालयांतून सुमारे १४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. कृषीव्यतिरिक्त शिक्षणाची सर्व अंगे शिवाजी विद्यापीठाकडे होती.[८५]

शिवाजी विद्यापीठ हे खऱ्या अर्थाने ग्रामीण जनतेचे विद्यापीठ व्हावे ही तळमळ डॉ. आप्पासाहेबांच्या मनात होती. विद्यापीठाला आतून तसेच बाहेरूनही परिपूर्णता आणून ग्रामीण जनतेला जिव्हाळा, आपुलकी वाटावी व विद्यापीठाच्या प्रवाहाशी ग्रामीण जनता समरस व्हावी म्हणून डॉ. पवारांनी विद्यापीठाच्या वतीने प्राध्यापक प्रशिक्षणाची योजना आखली. विद्यार्थी प्रतिनिधींची शिबीरे भरविली, विद्यार्थी भवनची स्थापना केली, ग्रामशिबीरे भरविली. त्यामुळे आज शिवाजी विद्यापीठ हे कोल्हापूरचं भूषण बनलं आहे.

आज शिवाजी विद्यापीठ हे बहुजन समाजाच्या आकांक्षा पुरं करणारं ध्येयवादी मंदिर बनलं आहे. बाहेरून जितकं भव्य, जितकं सुंदर आहे, जितकं आदर्श आहे, तितकंच ध्येयवादानं रसरसलेलं आणि सेवा वृत्तीनं भारलेल आहे. नव्या युगाची नवी पिढी निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हे आपले विद्यापीठ असल्याची भावना ग्रामीण जनतेच्या मनात दृढ झाली आहे.

## संदर्भ :


१) Edited by the Board of Editors, The Cyclopedia of India (Biographical, Historical, Administrative and Commercial) Vol. – III; Published in 1992, Published by Oriental Publications New Delhi – 110006, Page No. 90.

२) Ibid, P. 91

३) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा, पृष्ठ — २.

४) कित्ता, पृष्ठ — २ ते ३.

५) कित्ता, पृष्ठ — ४.

६) भिडे ग. रं., देशपांडे पु. ल., कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्विस, प्रथमावृत्ती, जानेवारी १९७१, पृष्ठ — ८०.

७) कित्ता, पृष्ठ — ७७—७९.

८) कित्ता, पृष्ठ — ८२.

९) कित्ता, पृष्ठ — ८४, ८५.

१०) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, उपरोक्त, पृष्ठ — १.

११) भिडे ग. रं., देशपांडे पु. ल., उपरोक्त, पृष्ठ — ४२.

१२) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, उपरोक्त, पृष्ठ — १.

१३) भिडे ग. रं., देशपांडे पु. ल., उपरोक्त, पृष्ठ — १२९.

१४) कित्ता, पृष्ठ — २७.

१५) कित्ता, पृष्ठ — २८.

१६) कित्ता, पृष्ठ — १३७.

१७) कित्ता, पृष्ठ — ४२७.

१८) कित्ता, पृष्ठ — १३८.

१९) कित्ता, पृष्ठ — २८.

२०) कित्ता, पृष्ठ — २९.

२१) कित्ता, पृष्ठ — २१.

२२) कित्ता, पृष्ठ — ४५.

२३) गर्गे स. मा., करवीर रियासत, गो. य. राणे प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती—१९८०, पृष्ठ — १५०.

२४) भिडे ग. र., देशपांडे पु. ल., उपरोक्त, पृष्ठ — ४९.

२५) मोडक बा. प्र., कोल्हापूर प्रांताचा अर्वाचिन इतिहास, पृष्ठ — ५३.

२६) भिडे ग. र., देशपांडे पु. ल., उपरोक्त, पृष्ठ — ५४.

२७) कित्ता, पृष्ठ — ५९.

२८) गर्गे स. मा., उपरोक्त, पृष्ठ ४५९.

२९) कित्ता, पृष्ठ — ४९५.

३०) कित्ता, पृष्ठ — ५८५.

३१) कित्ता, पृष्ठ — ६०८.

३२) कित्ता, पृष्ठ — ६३८.

३३) कित्ता, पृष्ठ — ६४१.

३४) कित्ता, पृष्ठ — ६४४.

३५) भिडे ग. र., देशपांडे पु. ल., उपरोक्त, पृष्ठ — ६६.

३६) भगत रा. तु., शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, पृष्ठ — २२.

३७) कित्ता, पृष्ठ — ३७.

३८) कित्ता, पृष्ठ — २२, २३.

३९) कित्ता, पृष्ठ — २३

४०) डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृष्ठ — ९.

४१) भगत रा. तु., उपरोक्त, पृष्ठ — ४४.

४२) कित्ता, पृष्ठ — ४६.

४३) डॉ. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृष्ठ — ६४.

४४) साळुंखे पी. बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, पृष्ठ — ५८७—५८८

४५) नाईक तु. बा., छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पृष्ठ — ७६.

४६) डॉ. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृष्ठ — ७०.

४७) कित्ता, पृष्ठ — ११८.

४८) सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू राजा आणि माणूस, पृष्ठ — १७१.

४९) नाईक तु. बा., उपरोक्त, पृष्ठ — ७५.

५०) डॉ. जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, पृष्ठ — ११८.

५१) डॉ. पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृष्ठ — १२२.

५२) कित्ता, पृष्ठ — १२५.

५३) कित्ता, पृष्ठ — १२५.

५४) भगत रा. तु., उपरोक्त, पृष्ठ — १२६.

५५) तावडे सी. रा., 'डॉ. आप्पासाहेब पवार — एक धडाडीचा प्रशासक आणि जिद्दीचा कार्यकर्ता, डॉ. आप्पासाहेब पवार जीवन दर्शन गौरव अंक, डॉ. आप्पासाहेब पवार सत्कार समिती, कोल्हापूर ५ मे १९६८, पृष्ठ — ९३.

५६) डॉ. सौ. जाधव भाग्यश्री, शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जीवन आणि कार्य (१९०६—१९८१), पृष्ठ — ८९.

५७) भगत रा. तु., उपरोक्त, पृष्ठ — १२६.

५८) जाधव अर्चना, डॉ. बाळकृष्ण — जीवन व कार्य; निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद प्रकाशन, फेब्रुवारी २००७, पृष्ठ — २७५.

५९) कित्ता, पृष्ठ — २७५.

६०) दै. पुढारी, कोल्हापूर, दि. १८ सप्टेंबर, १९५६, पृष्ठ — १.

६१) शिवसंदेश, त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, वर्ष पहिले, मार्च १९६९, पृष्ठ — ३१.

६२) कित्ता, पृष्ठ — ३१.

६३) डॉ. जाधव भाग्यश्री, उपरोक्त, पृष्ठ — ९१.

६४) तावडे सी. रा., उपरोक्त, पृष्ठ — ९३.

६५) दै. पुढारी, दि. १८ सप्टेंबर, १९५६, पृष्ठ — १.

६६) डॉ. जाधव भाग्यश्री, उपरोक्त, पृष्ठ — ९३.

६७) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६३—६४, पृष्ठ — १,२.

६८) तावडे, सी. रा., उपरोक्त, पृष्ठ — ९४.

६९) दै. पुढारी, ११ जुलै, १९६१, पृष्ठ – १.

७०) डॉ. जाधव भाग्यश्री, उपरोक्त, पृष्ठ – ९४.

७१) कित्ता, पृष्ठ – ९४.

७२) तावडे सी. रा., उपरोक्त, पृष्ठ – ९४.

७३) डॉ. जाधव भाग्यश्री, उपरोक्त, पृष्ठ – ९५.

७४) कित्ता, पृष्ठ – ९६.

७५) दै. पुढारी, कोल्हापूर, १ फेब्रु. १९६२, पृष्ठ – १.

७६) डॉ. जाधव भाग्यश्री, उपरोक्त, पृष्ठ – ९७.

७७) कित्ता, पृष्ठ – ९८.

७८) तावडे सी. रा., उपरोक्त, पृष्ठ – ९४.

७९) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६३–६४, पृष्ठ–३.

८०) कित्ता, पृष्ठ – १५.

८१) दै. पुढारी, कोल्हापूर, २१ सप्टेंबर १९६२, पृष्ठ – १.

८२) शिंदे सुखदेव पांडुरंग, एम.फील्. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, "दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळीला पुढारीचे योगदान" पृष्ठ – १३५.

८३) कित्ता, पृष्ठ – १३५.

८४) दै. पुढारी, कोल्हापूर, १९ नोव्हेंबर, १९६२, पृष्ठ – १.

८५) वार्षिक अहवाल, शिवजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६३–६४, पृष्ठ–३.